# मिरा भाईंदर महानगरपालिका
# वाहन विभाग
## जाहिर निविदा सुचना क्र.01
## सन 2026-27, सन 2027-28

**निविदेचे नाव:- महानगरपालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पद्धतीने वाहनचालक पुरवठा करणे.**

**Name Of Work :- Supplying drivers on contract basis for vehicles in various departments of the Mira Bhaindar Municipal Corporation.**

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

# ।। जाहिर निविदा सुचना क्र.01 ।।

निविदा क्र.............................. अनुक्रमांक...................................

निविदा फॉर्मची किंमत रु.................... निविदा अनामत रु....................

निविदेचे नाव :- महानगरपालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे

निविदा धारकाचे नाव श्री./मे.........................................................

......................................................................................

संपुर्ण पत्ता............................................................................

......................................................................................

निविदा सुचना प्रसिध्दीची तारीख दि...............वृत्तपत्राचे नाव....................

निविदा पत्रके विक्रीची मुदत............................... वेळ ....................

निविदा अनामत स्विकारण्याची मुदत.........................वेळ.....................

निविदा पत्रके स्विकारण्याची अंतिम तारीख दि.................वेळ...................

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : ८१९ २८२८.

# // निविदा दरसुची //

कामाचे नाव :- महानगरपालिका वाहनावर ठेका पद्वतीने वाहनचालक पुरवठा करणे

व्यवसायाचे नाव पुर्ण पत्ता ..........................................

..................................................................

अनामत रक्कम :- ...................... डी.डी.....................................

बॅंकेचे नाव ......................................................................

अ) वाहनचालक

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | प्रति दिन प्रति वाहनचालक दर | प्रति महिना प्रति वाहनचालक दर |
|---|---|---|---|
| १. | मोठे टेंम्पो | | |
| २. | लहान टेंम्पो | | |
| ३. | सक्शन पंप | | |
| ४. | जेटींग पंप | | |
| ५. | फिरता दवाखाना | | |
| ६. | मेडिकल व्हॅन | | |
| ७. | व्हॅक्सिन व्हॅन | | |
| ८. | शववाहिनी / रुग्णवाहिका | | |
| ९. | महिंद्रा पिकअप | | |
| १०. | अग्निशमन बंब | | |
| ११. | वॉटर टेंडर | | |
| १२. | कार | | |
| १३. | हायड्रोलिक शिडी | | |
| १४. | ट्रॅक्टर | | |
| १५. | ट्रक / टॅंकर | | |
| १६. | अॅपे पियागो टेंम्पो | | |
| १७. | महिंद्रा मॅक्सिमो | | |
| १८. | अशोक लेलॅंड / कॉम्पेक्टर | | |
| १९. | एल.पि.टी.अग्निशमन | | |
| २०. | टेंम्पो 709 / टेंम्पो 407 | | |
| २१. | विद्युत वाहन IEC | | |
| २२. | बॉबकॅट मशीन | | |
| २३. | स्विपिंग मशीन | | |
| २४. | मोबाईल फायर फायटर (बुलेट दोनचाकी) | | |
| २५. | गोबलर मशीन | | |
| २६. | अॅटी स्मॉग मशीन | | |

MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
**Indira Gandhi Bhavan, Chatrapati Shivaji Maharaj Marg,**
**Bhaindar (W), 401 101 Tal Dist-Thane**
Vehicle Department

## // Tender Rate list //

Name of Work :- Supplying drivers on contract basis for vehicles in various departments of the Mira Bhaindar Municipal Corporation.

Name of Contractors, Occupation Name & Address :----------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------

Cost of EMD Rs. ---------------------------------/- D.D.No.----------------------

**Bank Name :- -------------------------------------------------------------------------**

A) Driver

| Sr. No | Types of Vehicle | Per Day rate of Per Driver | Per Month rate of Per Driver |
|---|---|---|---|
| 1. | Tempo(Heavy) | | |
| 2. | Tempo(Light) | | |
| 3. | Suction pump | | |
| 4. | Jeting pump | | |
| 5. | Mobile Clinic | | |
| 6. | Medical Van | | |
| 7. | Vaccine Van | | |
| 8. | Hearse Van / Ambulance / Cardiac Ambulance | | |
| 9. | Mahindra pickup | | |
| 10. | Fire Brigade | | |
| 11. | Water Tender | | |
| 12. | Car | | |
| 13. | Hydraulic Staircase | | |
| 14. | Tractor | | |
| 15. | Truck / Tanker | | |
| 16. | Ape Piyogo Tempo | | |
| 17. | Mahindra maximo | | |
| 18. | Ashok Leyland / compactor | | |
| 19. | L.P.T. Fire Brigade | | |
| 20. | Tempo 709 / Tempo 407 | | |
| 21. | Electric Vehicle IEC | | |
| 22. | Bobcat Machine | | |
| 23. | Sweeping Machine | | |
| 24. | Mobile Fire Fighter (Bullet Two Wheeler) | | |
| 25. | Gobbler Machine | | |
| 26. | Catalytic Converter anti smog dust suppression system vehicle | | |

## निविदा पत्रकाविषयी नियम व अटीशर्थी सन 2026-2028

1) निविदा पत्रक संबंधीची सविस्तर माहितीच्या छायांकित प्रति शासकीय शुल्क आकारुन वाहन विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे मिळेल.
2) निविदा पत्रक किंमत ऑनलाईन सिस्टिमव्दारे भरण्यात यावी. चेकने रक्कम स्वीकारली जाणार नाही. तसेच निविदा पोस्टाने पाठविली किंवा स्वीकारली जाणार नाही.
3) निविदेसाठी EMD Receipt online system ऑनलाईन सिस्टिमव्दारे स्वीकारण्यात येईल. चेकने किंवा रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही.
4) निविदा बयाना/सुरक्षा अनामत वर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब आकार दिले जाणार नाही.
5) निविदा ऑनलाईन सादर केल्यानंतर सादर निविदा कागदपत्रे सीलबंद करुन वाहन विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे 48 तासांच्या आत सादर करणे अनिवार्य राहील. तसे न केल्यास सदर निविदाधारकाची निविदा रद्द केली जाईल.
6) निविदाधारकाने नेटवरुन डाउनलोड केलेल्या निविदा पत्रकातच दर भरुन शासनाच्या अधिकृत वेबसाईट http://www.mahatender.gov.in वर सादर केले पाहिजेत.
7) निविदाधारकाने निविदा पत्रात मनुष्यबळ व वाहन सेवा पुरविण्याचे दर (सेवा व वस्तू कर वगळून) यांची माहिती विहित केलेल्या नमुन्यात रकान्यात स्पष्ट अक्षरात अंकी व अक्षरी लिहिणे आवश्यक आहे.
8) निविदाधारकास निविदा मंजुर झाल्यानंतर ठेकेदाराने 5% सुरक्षा अनामत रक्कम रु.20,00,000/- (वीस लाख मात्र) व 1% अतिरिक्त सुरक्षा अनामत रु.4,00,000/- (चार लाख मात्र) मनपाकडे डी.डी. स्वरुपात जमा करावी. सुरक्षा अनामत रक्कमेस व्याज दिले जाणार नाही.
9) सदर कामी करारनामा तयार करुन मुंबई मुद्रांक अधिनियम 1998 या कायदयाअंतर्गत सदर करारनाम्यावर अपेक्षित मुद्रांक शुल्क भरुन कायदेशीर कारवाई आपल्यामार्फत करण्यात यावी.
10) निविदा सादर करताना दोन लिफाफा पध्दतीने खालीलप्रमाणे कराव्यात.

अ) लिफाफा क्र.1 मध्ये खालील साक्षांकित कागद पत्रे सादर करावीत.

१) **निविदेची फी (Tender Form Fee)**
२) **बयाना रक्कम - (Earnest Money Deposit) (EMD)**
३) **वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate)**
४) पॅनकार्ड प्रत
५) **निविदाधारकांचे (Bidder) कंपनी / भागीदारी संस्था / प्रोपायटरी फर्म्सचे संबंधित संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र**
६) सरासरी वार्षिक उलाढाल :- निविदाकाराची मागील 3 आर्थिक वर्षाची (2022-23, 2023-24, 2024-25) सरासरी वार्षिक उलाढाल कामाच्या वार्षिक किंमतीच्या किमान 50% असावी. (याबाबत उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate) Chartered Accountant (सनदी लेखापाल) यांनी प्रमाणित केलेले असावे.
७) **अनुभव --- निविदाकाराने मागील 3 आर्थिक वर्षात (2022-23, 2023-24, 2024-25) शासकीय / निम शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निविदेतील 50% मनुष्यबळ पुरवठा केलेले काम**

**(अनुभवासाठी निविदाकाराने प्रत्यक्ष केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. कार्यादेश चालणार नाही.)**

८) **व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (PT)**

९) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र (EPF)

१०) **कर्मचारी राज्य विमा निगमचे प्रमाणपत्र (ESIC)**

११) **निविदाकाराने कार्यादेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत कंत्राटी कामगार कायद्यांतर्गत कामगार परवाना सादर करण्यात येईल असे प्रतिज्ञापत्र.**

१२) **निविदा सादर करे पर्यंत निविदाकार इतर कोणत्याही सरकारी / निम शासकीय / महामंडळात काळ्या यादीत टाकले नसल्याबाबतचे हमीपत्र.**

१३) **निविदाकाराने निविदेसोबत सादर केलेल्या दस्ताऐवजांची सत्यता दर्शविणारे रु.500 /- च्या स्टँम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र**

**ब) लिफाफा क्र.2 मध्ये**

१) निविदा पत्रक दरसूची सादर करणे
निविदा दरसूची संकेत स्थळावर online उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यामध्ये दर भरावेत.

२) निविदा सादर करतांना ठेकेदारांने प्रशासकीय शुल्क विचारात घेवून निविदा भरणे आवश्यक आहे. ठेकेदाराने 3.85 टक्के पेक्षा कमी व 7 टक्केपेक्षा जास्त सर्व्हिस चार्ज आकारू नये, अन्यथा निविदा फेटाळण्यात येईल. किमान वेतन अधिनियम 1948 व वेतन नियम 1963 मधील तरतुदीचे पालन करणे आवश्यक आहे. किमान वेतना पेक्षा कमी दर भरल्यास सदर निविदाधारकाची निविदा नामंजुर करण्यात येईल.

३) एजन्सीने मागील 01 वर्षात (2025-2026) सहा महिने किमान 100 वाहनचालक पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र / अनुभवाचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

४) संस्था /कंपनी यांनी ई-निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन त्यापैकी वरील (अ) च्या लिफाफयात तांत्रिक बाबींचा व (ब) च्या लिफाफयात वित्तीय बाबींची सही शिक्यांसह कागदपत्र स्कॅन करुन अपलोड करावीत.

५) महानगरपालिका निश्चित करेल अशा तारखेला व वेळेवर निविदा उघडण्यात येईल. त्या दिवशी निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनिधीना उपस्थित राहता येईल. ते गैरहजर असले तरी निविदा उघडण्यात येतील. निविदा उघडताना प्रथम लिफाफा क्रमांक 1 उघडण्यात येईल. लिफाफा क्रमांक 1 मधील कागदपत्रे परिपूर्ण असल्यानंतरच लिफाफा क्रमांक 2 उघडण्यात येईल. अपरिपूर्ण कागदपत्रे असलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

६) कोणतीही निविदा पूर्णपणे किंवा अंशत: स्वीकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचे, तसेच कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

७) ठेकेदार व कर्मचारी यांच्यामध्ये कोणताही तंटा/ वाद निर्माण झाल्यास महानगरपालिका हस्तक्षेप करणार नाही.

८) नुतनीकरण अद्यावत असलेला जीप, कार व अवजड वाहन चालवण्याचा मोटार वाहन कायद्यांतर्गत आवश्यक असलेला वाहन चालविण्याचा परवाना वाहन चालकाकडे असणे आवश्यक आहे.

९) वाहन चालकाचे ओळखपत्र, आधारकार्ड, निवडणूक कार्ड, पॅन कार्ड इ.पैकी एक त्याच्याजवळ असावे.

१०) वाहनचालकाचे वय १८ वर्षे पूर्ण असावे व ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

११) वाहन चालकाला वाहन चालविण्याचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. वाहनचालकाने पोलीस तपासणी अहवाल देणे बंधनकारक आहे. संस्थेतर्फे पुरविण्यात येणारा वाहनचालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा किंवा प्रवृत्तीचा नसावा.

१२) वाहनचालकास वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.

१३) वाहनचालक शारिरीकदृष्ट्या सक्षम असावा. त्याची वागणूक विनम्रतेची आणि सहकार्याची असावी.

१४) वाहन चालकाची वैयाक्तिक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा. शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी व अलीकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटोग्राफ.

१५) ठेका वाहनचालक कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाहीत तसेच त्यांना शासकीय सेवेत घेणे बंधनकारक राहणार नाही.

१६) कार्यालयीन कामकाजाच्या आवश्यकतेनुसार कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त वाहनचालकास काम करणे आवश्यक राहील.

१७) आवश्यकता भासल्यास सुट्टीच्या दिवशीही कामावर बोलाविण्यात येईल.

१८) वाहन स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे ही कंत्राटी वाहनचालकाची जबाबदारी असेल.

१९) कंत्राटी वाहन चालकास शासकीय कामानिमित्त आवश्यकता भासल्यास मुंबई / बृहन्मुंबई (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीच्या) बाहेरील क्षेत्रात वाहन चालवावे लागेल.

२०) वाहन चालकाने ड्युटीवर असतांना नशापान / धुम्रपान व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करता कामा नये असे केल्यास सर्वत्र जबाबदारी ठेकेदारावर राहील याची नोंद घ्यावी.

२१) महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कंत्राटदाराने / पुरवठादाराने उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह देयक सादर करावे. देयक पारित झाल्यानंतर रक्कम प्रदान करण्यात येईल.

२२) वाहनचालकाचे मासिक पारिश्रमिक कंत्राटदाराने / पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत संबंधित वाहन चालकाच्या बँक खात्यावर जमा करणे आवश्यक राहील.

२३) कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी वाहनचालकांना किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास संबंधित कंत्राटदार / पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाईस पात्र आहेत.

२४) कंत्राटदारास / पुरवठादारास रक्कम अदा करताना आयकर कायद्यातील तरतुदीनुसार आयकराची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल.

२५) कंत्राटदाराने / पुरवठादाराने नेमलेल्या कंत्राटी वाहनचालकास दैनंदिन काम करताना काही इजा व हानी झाल्यास संबंधितास नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार / पुरवठादार याला अदा करावा लागेल. सदर वाहनचालकाच्या सेवेचे तसेच त्यास झालेल्या इजा वा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शासनावर असणार नाही. या अनुषंगाने संबंधित वाहनचालकाचा नियमानुसार विमा उतरविण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.

२६) कंत्राटी वाहनचालकास नियमित शासकीय कर्मचाऱ्यांचे नियम / अटी व शर्ती लागू असणार नाहीत. नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांना कोणतेही वेतन, भत्ते व अनुषंगिक लाभ अनुज्ञेय असणार नाहीत व त्यांच्या सेवेचे कोणतेही दायित्व शासनावर असणार नाही.

२७) कंत्राटी वाहनचालकाकडून होणाऱ्या शासकीय मालमत्तेच्या कोणत्याही नुकसानीची ७जबाबदारी संबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांच्यावर राहील.

२८) कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास किंवा विहित वेळेत वाहनचालक उपलब्ध करुन न दिल्यामुळे अन्य मार्गाने वाहनचालक उपलब्ध करुन घेतल्यामुळे त्यास काही पारिश्रमिक द्यावे लागल्यास ती सर्व रक्कम कंत्राटदाराच्या / पुरवठादाराच्या प्रलंबित देयकातून अथवा सुरक्षा ठेवीतून कपात करण्यात येईल.

२९) कंत्राटी वाहनचालकाच्या अनुपस्थितीच्या दिवशी कंत्राटदाराने / पुरवठादाराने पर्यायी व्यवस्था करुन दिली पाहिजे.

३०) करारातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत व विहित वेळेत वाहनचालक पुरविणेबाबत रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक राहील.

३१) कंत्राटदाराने / पुरवठादाराने एकूण कंत्राट रकमेच्या 3% (तीन टक्के) एवढ्या रकमेची राष्ट्रीयकृत बँकेची गॅरंटी करारनामा करतेवेळी देणे बंधनकारक राहील. सदर रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही.

३२) कराराचे पालन समाधानकारकपणे न झाल्यास करार केव्हाही संपुष्टात आणणे, तसेच कराराची मुदत वाढविणे याबाबतचा निर्णय महापालिकेचा राहील.

प्रणाली घोंगे
उपायुक्त (वाहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका